जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ८११ दिनांक - १६/११/२०२३**

भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन,पुणे शहर

## जिवे ठार मारण्याचा प्रयत्न करणा-यांना केले जेरबंद

दिनांक १२/११/२०२३ रोजी फिर्यादी हे माऊली मेडीकल समोरील पानसे दवाखान्याजवळ, कात्रज भाजी मंडई, पुणे येथे याठिकाणी थांबले असताना आरोपी नामे तेजस नवनाथ खाटपे, व इमरान शेख, यांनी फिर्यादी यांचे सोबत एक महिन्यापुर्वी दारु पिण्यावरुन झालेल्या भांडणाच्या रागातुन आरोपी तेजस खाटपे याने त्याचे कडील लोखंडी हत्यार हे आरोपी इमरान शेख याचेकडे देवुन त्याने ते हत्यार हवेत फिरवुन शिवीगाळ करुन दहशत निर्माण करुन फिर्यादी यांचे डोक्यात जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने मारुन त्यांना गंभीर जखमी केले आहे म्हणुन फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन गुन्हा रजि नंबर ७२८/२०२३, भादंवि कलम ३०७,५०४,५०६, आर्म ॲक्ट ४,२५, महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१)(३) सह १३५ , क्रिमीनल अमेंन्टमेंन्ट ॲक्ट कलम ७ अन्वये गुन्हा दाखल आहे.

दाखल गुन्हयातील आरोपी **१) तेजस नवनाथ खाटपे, वय १९ वर्षे, रा. राम मंदीराजवळ, आंबेगाव बु, पुणे २) इमरान जानमहंमद शेख, वय २६ वर्षे, रा.संतोषनगर, कात्रज, पुणे** यांचा भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनकडील तपास पथकाचे अधिकारी व अंमलदार हे शोध घेत असताना पोलीस अंमलदार **अभिजीत जाधव व विक्रम सावंत** यांना त्यांचे बातमीदारामार्फेत बातमी मिळाली की, नमुद आरोपी हे कात्रज तलाव येथे थांबले असुन ते पळुन जाण्याच्या तयारीत आहेत. लागलीच भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनचे तपास पथकाचे अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी कात्रज तलाव येथे जावुन नमुद आरोपीतांचा शोध घेवुन त्यांना अटक केली आहे.

सदरची कामगिरी मा.अपर पोलीस आयुक्त,पश्चिम प्रादेशीक विभाग,पुणे श्री.प्रविणकुमार पाटील, मा.पोलीस उप आयुक्त परिमंडळ २, श्रीमती स्मार्तना पाटील मा.सहाय्यक पोलीस आयुक्त स्वारगेट विभाग, पुणे श्री.नारायण शिरगावकर यांचे मार्गदर्शनाखाली भारती विदयापीठ पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.विनायक गायकवाड, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री.विजय पुराणिक, श्री.गिरीश दिघावकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल रसाळ, पोलीस उप निरीक्षक धिरज गुप्ता, पोलीस अंमलदार विक्रम सावंत, अभिजीत जाधव, शैलेश साठे, चेतन गोरे, महेश बारावकर, निलेश ढमढेरे, मंगेश पवार, हर्षल शिंदे, अवधतु जमदाडे, सचिन सरपाले, धनाजी धोत्रे, सचिन गाडे, निलेश खैरमोडे, आशिष गायकवाड, अभिनय चौधरी, राहुल तांबे, यांच्या पथकाने केली आहे.